**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२९/०७/२०२६

## *धोकादायक इमारतींवर निष्कासन कारवाई सुरु*

अतिधोकादायक/धोकादायक इमारती बाबत शासन परिपत्रक क्र. विसआ-२०१५/प्र.क्र.३४९/नवि-२०, दि. ०५ नोव्हेंबर २०१५ अन्वयेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमार्फत कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यान्वये सन २०२६ मध्ये एकूण ७४ इमारती/घरे धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २६४ अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करुन सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याबाबत वसई विरार महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी नोटिसा देण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेमार्फत धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात ७४ इमारतींवर निष्कासन कारवाई करणेबाबत महानगरपालिका प्रशासन, पोलीस प्रशासन व महावितरण विभाग यांच्यात संयुक्त आढावा बैठक घेऊन कारवाईची रूपरेषा ठरविण्यात आली होती. त्यानुसार आज दि.२९ जुलै २०२६ रोजी ७४ धोकादायक इमारतींपैकी *१९ रिकाम्या* केलेल्या इमारतींवर *निष्कासनाची* कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. सदरील कारवाई सुरूच राहणार असून धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आलेल्या सर्व इमारती/घरे महानगरपालिकेमार्फत निष्कासीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २६४ अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करुन सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे व महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटिसा व सूचनांचे काटेकोर पालन करावे. याचबरोबर, वसई-विरार शहरात अलीकडील काळात धोकादायक म्हणून घोषित नसलेल्या काही इमारतींमध्येही छत/स्लॅब कोसळण्याचा घटना घडल्या आहेत. त्यामुळे इमारतीच्या वयाची पर्वा न करता सर्व गृहनिर्माण संस्था, इमारत मालक व व्यवस्थापन यांनी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून दरवर्षी इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) लेखापरिक्षण करुन घेणे तसेच अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती, मजबुतीकरण व प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणे आवश्यक आहे.
धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांचे पालन न करणे, तसेच इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) न करणे किंवा अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती न करणे यामुळे कोणतीही दुर्घटना, छत/स्लॅब कोसळणे, इमारतींचा काही भाग किंवा संपूर्ण इमारत कोसळणे, जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित इमारत मालक, विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था/सोसायटी, भोगवटादार व व्यवस्थापन पूर्णपणे जबाबदार राहील, अशा घटनांसाठी वसई-विरा शहर महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.